

डॉ. सुरेश शेळके

# समानतेच्या वाटेवर

## महिला ▲ पुरुष साथ साथ

पॉश कायद्याचा वापर तर दूरच अजूनही बहुतांश महिला या कायद्याविषयी अनभिज्ञ आहेत. पॉश कायद्याअंतर्गत कार्यालयांमध्ये असणाऱ्या समितीचा सदस्य म्हणून काम करताना ही त्रुटी जाणवते. विशेषतः ग्रामीण भागात महिलांना वारंवार छळाचा सामना करावा लागतो. अशावेळी त्या कुठेही असल्या तरी सुरक्षित असाव्या आणि अशा अडचणीत सापडलेल्या महिलांना पुरुषांनीही साथ द्यावी असे वाटते.

कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळाच्या प्रसंगातून शहरी आणि ग्रामीण भागातील महिलांना जावे लागते. हे प्रमाण अधिक असले तरीही बहुतांश वेळा अशा घटनांची नोंद केल्या जात नाही. यामागच्या कारणाचा अभ्यास केला तर, ''महिलांना आपली बदनामी होईल'', ''पतीला समजले तर तो काय म्हणेल'', ''कुटुंबात आपले म्हणणे कोणी ऐकून घेणार नाही'', '' आपले सहकारी काय म्हणतील, ते आपल्यालाच दोष देतील'' अशी महिलांची द्विधा मनस्थिती असते. महिलांचा होणारा लैंगिक छळ हा नवीन नाही, तरीही त्याविरोधातली कायद्याची अंमलबजावणी शहरांमध्ये अद्यापही प्रभावीपणे केली जात नाही. शहरात ही स्थिती असेल तर ग्रामीण पातळीवर काय० खेड्यातील महिलाही रोजंदारी, मजुरीसाठी मोठ्या संख्येने कामासाठी बाहेर असतात. आमच्या आशा केंद्राच्या माध्यमातून ग्रामीण भागातील आरोग्य क्षेत्रात आम्ही गेली ४० वर्ष काम करत आहोत. हे काम करताना खेडोपाडी जेव्हा जातो तेव्हा, अनेक वेळा महिलांना मुकदामाकडून अश्लील भाषेत शिवीगाळ होणे, वाईट नजरेने महिलांकडे बघणे अशा घटना समोर येत असतात. महिलांना त्यांच्या सोबत घडणाऱ्या या वाईट प्रसंगांसाठी दाद कुणाकडे मागायची याची माहिती नसते. बर काम सोडलं तर दुसरं काम कधी मिळेल, कुठे मिळेल याची शाश्वती नसते. त्यामुळे आहे ते काम ग्रामीण भागातील महिला सुरू ठेवतात. परिणामी त्यांना बरेचदा लैंगिक छळांच्या सारख्या प्रसंगांना सामोरे जावे लागते, हा माझा अनुभव आहे.

''पॉश'' कायद्याच्या अंतर्गत असलेल्या महिला तक्रार निवारण समितीचा सदस्य म्हणून मी काम करतो. काही दिवसांपूर्वी खासगी कामासाठी एक महिला त्या संस्थेत आली होती. तेव्हा तिथेच असलेल्या चहाच्या टपरी चालकाने तिला चहा देण्याच्या बहाण्याने स्पर्श केला. काम करून ही महिला घरी जात असताना तिला रस्त्यात अडवून जबरदस्ती करण्याचा प्रयत्न केला. महिलेने जेव्हा त्याला प्रतिकार केला. त्यावेळी त्याने तिला तुझा माझ्याकडे व्हिडिओ आहे. हा व्हिडिओ मी सोशल मीडियावर व्हायरल करेल अशी धमकी दिली. महिला त्याच्या धमकीला बळी न पडता निघून जाण्याचा प्रयत्न करत होती. त्यावेळी त्या व्यक्तीने तिला ती जेव्हा सार्वजनिक शौचालयचा वापर करण्यास गेली होती तो व्हीडिओ दाखवला. ती महिला घाबरली आणि त्याचाच गैरफायदा त्या व्यक्तीने घेतला. घडलेला सर्व प्रकार तिने पतीला सांगितला. पण पतीने तिच्यावर विश्वास न ठेवता तिला मुलांसह माहेरी आणून सोडले. आपला २०-२२ वर्षांचा संसार मोडत आहे. जे घडले त्यात आपली काहीच चुकी नव्हती, हे ती कसे पटवून देणार. शेवटी ती तिच्या आईसोबत तालुक्याला गेली आणि संबधित व्यवस्थापकला ही घटना सांगितली. व्यवस्थापकाने वरिष्ठांना सांगितले. या घटनेसाठी अंतर्गत महिला तक्रार निवारण समितीची बैठक बोलवण्यात आली. महिलेचे म्हणणे ऐकून घेतल्यावर टपरीचालकाचेही म्हणणे ऐकून घेण्यात आले. त्याने आपण हे कृत्य केलेच नाही, यावर जोर दिला. या बाईला मी चहाचे पैसे मागितले म्हणून ती माझ्यावर असे आरोप करते, असे त्याचे म्हणणे होते. समिती सदस्य म्हणून जेव्हा आम्ही चर्चा केली त्यावेळी,'' घटना आपल्या प्रांगणात घडली नाही'', असा एक सुर आला. काही सदस्यांनी '' आपण महिलेवर विश्वास ठेऊन मान्य केले तरी घटना एकदाच तर घडली'', असे मत व्यक्त केले. अन्य समिती सदस्य काही बोलायला तयार नव्हते. शेवटी चर्चा करून ''ही घटना घडली'' हे समितीने मान्य केले. चहावाल्याला संबंधित कार्यालयाच्या प्रांगणातून त्याची टपरी बंद करण्याचे आदेश दिले. महिलेच्या पतीला बोलून व्हिडिओ महिलेला माहिती नसताना काढला गेला. त्यात तिची काहीच चूक नव्हती हे समजून सांगण्यात आले. तरीही पतीच्या मनात 'पण' होताच. पॉश कायदा उत्तम असला तरीही या कायद्याचा वापर प्रभावीपणे कसा होईल हा मुख्य प्रश्न आहे. पुरुष म्हणून काम करत असताना या कायद्याबद्दल आणि एकंदरीतच लिंग समभाव रुजविण्यासाठी मुले, तरूण आणि पुरुषांसोबत मोठ्या प्रमाणावर काम करणे ही अत्यंत आवश्यक आहे. शहरी भागात किमान या कायद्याविषयी महिलांना माहिती आहे. पण ग्रामीण अनेक ठिकाणी अशा समित्याच तयार झाल्या नाहीत. इथल्या संस्थाचालकांना याविषयी पुरेशी माहिती नाही. ज्या ठिकाणी अशा समित्या आहेत, त्या केवळ कागदावर तयार झालेल्या समित्या आहे. समिती सदस्यांची नावांचा फलक संस्थाचालाकांच्या केबिनमध्ये लावले जातात. जिथे सहजपणे कोणीही जावू शकत नाही. ग्रामीण भागात काम करताना लोकांना शिक्षित करणे, कायद्याचे ज्ञान देणे, लिंगसमभाव रुजविणे, ज्या समित्या आहेत त्याचे कामकाज नीट होते का हे पाहणे अत्यंत आवश्यक आहे. अन्याय झालेल्या महिलेला न्याय मिळेल. कारण कामाच्या ठिकाणी सुरक्षित वातावरण मिळेल ही जबाबदारी आपल्या सर्वांची आहे.

**(लेखक सीडीटी आशा केंद्राचे कार्यकारी विश्वस्त आहेत)**